
# पाच दिवसात मोडी शिका



- शुभम शरद पाटील

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# पाच दिवसांत मोडी शिका

(अभ्यास)

लेखक : शुभम शरद पाटील

# पाच दिवसांत मोडी शिका

## हे पुस्तक विनामूल्य नाही

हे पुस्तक वाचून झाल्यावर खर्च करा

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल Whatsapp करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

पाच दिवसांत मोडी शिका

लेखक - शुभम शरद पाटील

फोन नंबर - +९१ ९८२३३ ८६३११

ईमेल - shubhampatil111295@gmail.com

वेबसाईट - https://grabcad.com/shubham.patil-10

पत्ता - १. कमलानंद, ३४, डॉ. हेडगेवार नगर, धरणगांव,(४२५१०५) जिल्हा - जळगांव

२. श्री स्वामी समर्थ नगर भातखंडे बु.।। (४२४२०१)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237 (For free books)

प्रकाशन : ५ एप्रिल २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानचीलेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



# लेखकाची ओळख


**शुभम शरद पाटील**

भ्रमणध्वनी क्रमांक +91 98233 86311

ई-मेल – shubhampatil111295@gmail.com

वेबसाईट - https://grabcad.com/shubham.patil-10

पत्ता – १. ३४, "कमलानंद", डॉ. हेडगेवार नगर, धरणगांव (४२५१०५)

२. श्री स्वामी समर्थ नगर भातखंडे बु.ll (४२४२०१)


मेकॅनिकल इंजीनियर,

Catia V5 आणि keyshot सॉफ्टवेअर साठी Tutorials लिहीत असतो.

3D Modelling ची आवड,

3D Printing साठी व्यावसायिक डिझाईन करत असतो.

वाचनाची विशेष आवड, शक्यतो ऐतिहासिक वाचन करतो.

ऐतिहासिक वारसा स्थळांना भेट देण्याची आवड आहे.

आणि बरेच काही.........

# मनोगत

नमस्कार रसिकहो,

मी शुभम शरद पाटील, ई – साहित्य वरील माझे हे दुसरे पुस्तक. माझ्या पहिल्या पुस्तकाला (प्रवासवर्णनाला) वाचकांनी भरभरून प्रतिसाद दिला. पहिलेच लिखाण असल्याने वाचकांच्या पसंतीस पडते की नाही ही एक धाकधूक मनात होतीच. पण मायबाप वाचकांनी दिलेला प्रतिसाद इतका भरघोस होता की आत्मविश्वास शतपटीने उंचावला. खरोखरच हा एक प्रसन्न अनुभव होता. नव्हे आहे.

या पुस्तकाचा विषय जरा वेगळा आहे. मोडी लिपी महाराष्ट्रात कुणाला माहिती नाही. पण आज तिची अवस्था एखाद्या पदच्युत चक्रवर्ती सम्राटासारखी झाली आहे, ज्याने आधी खूप पराक्रम केले आणि काळाच्या ओघात त्याला प्रजा विसरली. “आमच्या आजोबांना मोडी येत होती,” इथपर्यंत आज मोडीची अवस्था आहे. संपूर्ण आर्यवर्तात, अगदी तंजावर येथील वाचनालयात मोडी कागदपत्रे अक्षरशः पडून आहेत. या कागदांना कुणी वाचक मिळत नाहीयेत. माझ्या मते ही कागदे नसून मराठ्यांच्या इतिहासातील रत्ने आहेत, पण आमचे दुर्दैव असे की आमच्याकडे रत्नपारखिच नाही. या असंख्य मोडी कागदांतून कदाचित काही नवीन इतिहास समोर येऊ शकतो, काही नवीन घटना समजू शकतात, काही वादांचे निरसन होऊ शकते.

या पुस्तकात मोडी बाराखडी शिवाय लिपीची गरज, उत्पत्ति, जोडाक्षरे आणि काही ऐतिहासिक पत्रे मोडी लिपीत दिली आहेत. मोडी बाराखडी शिकण्यासाठी पाच दिवस पुरेसे आहेत, पण सफाईदार मोडी वाचक वा लेखक होण्यासाठी प्रयत्नांशिवाय दूसरा उपाय नाही. काही महिन्यांच्या प्रयत्नाने मोडी वाचन – लिखाण सुसह्य होतेच होते. १९५२ नंतर मोडी शिक्षण महाराष्ट्रातून बाहेर झाली, मुद्रणातील काठीण्यामुळे वा इतर कारणांमुळे मोडी हद्दपार झाली ती कायमचीच. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मोडी कागदपत्रांचे

लिप्यांतर करण्यासाठी आवाहन केले होते, त्यावेळी त्यांना चक्क जपान येथून संपर्क झाला होता की, तुमच्याकडे लिप्यांतर करणारे नसतील तर आम्ही पाठवू का ? खरे म्हणजे ही तर शोकांतिकाच आहे. आज मोडी लिप्यांतर होणे ही काळाची गरज आहे. मोडी लिपी ही व्यक्तिपरत्वे बदलत असल्याने वाचण्यास जरा अवघड आहे. पण इतके घाबरण्याची गरज नाही, सरावाने सारे साध्य होते.

हे पुस्तक लिहिताना मी जवळपास अठरा पुस्तके अभ्यासली. या पुस्तकांतून माला भरपूर नवीन गोष्टी समजल्या आणि मी इतिहासाच्या अजून थोडा जवळ गेलो. खरे म्हणजे इतीहास हा माला वर्तमानाचा गुरु – मित्र – सखा – मार्गदर्शक वाटतो. इतिहासातून योग्य तो बोध घेऊन वर्तमान काळात आलेल्या परिस्थितीशी सामना करून परिस्थितीवर विजय मिळवणे हाच इतिहासाचा खरा अभ्यास ठरेल. असो,

श्री सुनील सामंत सर आणि संपूर्ण ई – साहित्य टिमचे मनापासून आभार.

बहुत काय लिहिणे , तुम्ही सुज्ञ असा.

शुभम शरद पाटील.




http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/varanasi_shubham_patil.pdf

# अर्पणपत्रिका

***भूत, वर्तमान आणि भविष्याला***

***साक्षीदार असणाऱ्या त्या***

***एकमेवाद्वितीय चैतन्य शक्तीस ........***

# अनुक्रमणीका


| प्रकरण क्रमांक | प्रकरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १.० | लिपीची आवश्यकता | १ |
| २.० | मोडी लिपी परिचय | ३ |
| ३.० | मोडी आणि अशोक लिपी | ५ |
| ४.० | बालबोध, देवनागरी आणि मोडी लिपी | ७ |
| ५.० | मोडी बाराखडी | ८ |
| ६.० | पाच दिवसात मोडी | ३८ |
| ७.० | जोडाक्षरे | ४४ |
| ८.० | पत्रांचे मायने | ४५ |
| ९.० | सरावासाठी काही ऐतिहासिक पत्रे | ५५ |
| १०.० | संदर्भग्रंथ | ५८ |

इतिहासाचे अवघड ओझे
डोक्यावर घेऊन ना नाचा
करा पदस्थल त्याचे आणिक
चढुनी त्यावर भविष्य वाचा

-विं. दा. करंदिकर

# पाच दिवसांत मोडी शिका

# १.० लिपीची आवश्यकता

भारतात लेखनपद्धतीला **लिपी** असे म्हणतात. लिपी या शब्दाचा संस्कृत अर्थ होतो शिंपडणे अथवा चितारणे. पाणीनी अष्ट्याध्यायी मध्ये लिपी, लिपिकार अशा शब्दांचा उल्लेख आढळतो. एकमेकांचे विचार कळविण्यास भाषा हे साधन आहे. पण हेच विचार, तत्वज्ञान, अनुभव जेव्हा पुढील पिढ्यांना सांगण्यासाठी जेव्हा कालमर्यादा येतात तेव्हा हेच शब्द संचय करण्यासाठी लिपीचा जन्म होतो. गरज ही शोधाची जननी आहे. कारण मागच्या काळातील किंवा मागच्या पिढ्यांचे विचार हे आजच्या विचारांचा पाया असतात, किंबहूना आहेत. हेच विचार जर कुठे नमूद करून ठेवले नाहीत तर ते पुढील पिढ्यांच्या विचारांचा पाया कसे होऊ शकतील ? लिपी ही प्रतिकात्मक वाटत असली तरी तिचे दोन प्रकार पडतात, ती एकतर **चित्रमय** असते किंवा **सांकेतिक** तरी असते.

१.० कालानुरूप विस्मरणाची वृद्धी

२.० मौखिक अविश्वासनियतेची वृद्धी

३.० युक्तायुक्तविवेकशून्य प्रचारस्वातंत्र्य

काही महत्वाच्या बाबी ज्या कायमस्वरूपी लागणार आहेत त्या लक्षात ठेवण्यासाठी आपली स्मरणशक्ती सदाकाळ समर्थ नसते. त्याचप्रमाणे आज्ञांवर, सूचनांवर विश्वास ठेवण्यासाठी काहीतरी पुरावा म्हणून अधिकारी वा राजाच्या सहीचे-शिकक्याचे पत्र मौखिक विश्वसनियतेची ग्वाही देते. यात राजमुद्रा वा राजमुद्रेवरील राजचिन्हे ही सांकेतिक लिपीचे प्रतीक आहेत. तसेच आपले विचार, साहित्य यांचा प्रचार करण्यासाठी हे लिहून ठेवण्याची गरज भासू लागली. आपण जसजसा मागील काळाचा अभ्यास केला तसे आपणास आढळून येईल की याच तीन  कारणांमुळे लिपीचा वापर हा मर्यादित होता. अत्यावश्यक ठिकाणीच लिपीचा वापर केला जात असे. पण जसजसी काळानुसार कारणे वाढली तशी लिपीची आवश्यकता

वाढत गेली आणि आज लिपी ही आपल्या दैनंदिन जीवनातील आवश्यक बाब झाली. बौद्ध ग्रंथ ललितविस्तारात ६४ लिप्यांचा उल्लेख आला आहे.

व्यवहारप्रकाश या ग्रंथात एक श्लोक आहे, तो असा –

**षाण्मासिकेऽपि समये भ्रांतिस्सन्जयते नृणाम ।**

**धात्राक्षराणि सृष्टानि पत्रारूढान्यतः पुरा ॥**

सहा महिन्यांचे काळात देखील मनुष्यांना विस्मृती होऊन जाते. या करिता तशी विस्मृती न होण्यासाठी ब्रम्हदेवने पूर्वी निर्माण करून ठेवलेल्या अक्षरांना लोक पत्रारूढ करून ठेवतात.

# २.० मोडी लिपी परिचय

**'मोडी'** असे नाव माहिती नाही असे शक्यतो कुणीही महाराष्ट्रात सापडणार नाही. महाराष्ट्र वीरांची, इतिहास प्रेमींची  तथा रसिकांची भूमी आहे. मोडी लिपी महाराष्ट्रात सुमारे बाराव्या शतकापासून वापरात तथा लिखाणात आहे. मोडी लिपीच्या उत्पत्तीच्या बऱ्याच आख्यायिका आहेत पण मोडी निर्मिती कशी व कधी झाली याबाबत कुणाचेही एकमत नाही. साधारणतः श्री हेमाद्रीपंत तथा हेमचंद्र पंडित यांना मोडी लिपीचे जनक मानतात पण ते फक्त मोडी लिपीचे प्रचारक आहेत असे चांदोरकरांचे म्हणणे आहे. पण तरीही श्री हेमाद्रीपंत यांना खूप आदराचे स्थान आहे. राजकार्यधुरंधर, युद्धकलापटू, उत्कृष्ट ग्रंथकर्ता, मुत्सदी, शिल्पशास्त्र पारंगत असा हेमाद्री वत्स गोत्री ब्राम्हण होता. देवगिरीच्या राज्याचे वैभव वाढवून ते साम्राज्यपदास पोहोचविण्यास हेमाद्री बऱ्याच अंशी करणीभूत झाला. या काळात त्याने मोडी लिपीचा प्रचार मोठ्या प्रमाणावर केला. चांदोरकरांच्या म्हणण्यानुसार मोडी व अशोकलिपी या मुळांत एकच आहेत आणि त्यांची जननी बालबोध तथा देवनागरी आहे. मोडीची परंपरा जर सम्राट अशोकाच्या काळापर्यंत जाते तर तिची उत्पत्ति बाराव्या शतकात होणे शक्य नाही. यात हेमाद्री यांनी श्रीलंकेत जाऊन मोडी आणली ही बाब खोटी ठरते. वास्तविक पाहता **मोडी लिपी ही देवनागरी आणि आशोक लिपीचा एक सुरेख संगम आहे.** असो,

यादव काळापासून सुरू झालेला हा मोडीप्रवास अगदी परवापर्यंत म्हणजे १९६० – ६२ पर्यन्त बहरून आला होता. अगदी १९६० पर्यन्त महाराष्ट्रातील प्राथमिक शाळांत मोडी शिकवली जायची. मात्र छपाईला अवघड असल्याने तसेच लिपि व्यक्तिपरत्वे बदलत असल्याने काळाच्या ओघात मोडी मागे पडली ती कायमचीच. साधारणतः कालपरत्वे मोडी विभागायची झाल्यास तिचे चार सुस्पष्ट भाग पडतील ,

१.० यादवकालीन

२.० शिवकालीन

३.० पेशवेकालीन

४.० आंग्लकालीन

पैकी यादवकालीन दस्तऐवज वाचण्यास बऱ्यापैकी कठीण असतात. शिवकालीन पत्रे वा दस्तऐवज त्यामानाने सोपी आहेत. पेशवेकाळात तर ज्याचे अक्षर सुरेख असेल त्याला चिटणीशी फडावर नोकरीसाठी प्राधान्य असे. अगदी काल-परवापर्यंत सुस्थितीत असणाऱ्या या मायमोडीला असे दिवस यावेत ही देखील  शोकांतिकाच आहे.

मोडी लिपी ही अत्यंत सैल असून कोणतेच नियम न पाळली जाणारी एकमेव लिपी आहे. व्यक्तीगणीक लिखाणाची पद्धती असल्याने छापील मोडी अक्षरे वाचता आली तरी वेगवेगळ्या काळातील मोडी अक्षरांचे वळण वेगवेगळे असते. जलद व लपेटीयुक्त लिखाणामुळे मोडी लिपी दिसण्यात अत्यंत सुंदर, डौलदार व ऐटबाज वाटते. इ. स. १९५२ पासून शालेय शिक्षणातून मोडी अंतर्धान पावली. अगदी उत्तर भारतापासून ते तंजावर पर्यन्त वाचनालयांत असंख्य मोडी कागदपत्रे, रुमाल अक्षरशः पडून आहेत. काहिजणांकडून असे ऐकू येते की आमच्या आजोबांना येत होती मोडी वगैरे...

आता मुळ विषयाकडे.......


# ३.० मोडी आणि अशोक लिपी

हेमाद्री पंतांनी मोडी श्रीलंकेतून आणली असा समज आहे. पण त्यात तथ्य नाही.चांदोरकरांच्या मते आज प्रचलित असलेली बालबोध लिपी हे प्राचीन देवनागरी लिपीचे आधुनिक स्वरूप आहे. तर मोडी हे अशोक लिपीचे वा पाली लिपीचे आधुनिक स्वरूप आहे, मोडीचे अशोक लिपी किंवा मौर्य लिपीशी साम्य आहे. मौर्यलिपीचा ललितविस्तरामध्ये (एक बौद्ध ग्रंथ) उल्लेख आहे. तिचे दुसरे नाव पाली लिपी,

## अशोक आणि मोडी लिपीतील साम्य

- मोडी लिपीत अपूर्ण अक्षर वा वर्ण काढण्याची सोय नाही, असेच स्वरूप अशोक लिपीचे देखील आहे. म्हणजे दोघी लिपीत एक अपूर्ण वर्ण काढून दूसरा वर्ण जोडता येत नाही. कारण अपूर्ण वर्ण कसा काढावा याचे स्वरूप उपलब्ध नाही.
- मोडी लिपीत ह्रस्व – दीर्घ यांच्यासाठीची चिन्हे नाहीत. अशोक लिपीचे ही तसेच आहे.
- मोडीत **ऋ, ऐ** हे स्वर नाहीत, अशोक लिपितही ते नाहीत तसेच त्यांची चिन्हेही नाहीत.
- ह्रस्व – दीर्घ स्वरांच्या खुणा वर्णास लावण्याचे पद्धतीत अशोकलिपीचे आणि मोडीचे अत्यंत साम्य आहे.
- **आ** ची खुण आशोक लिपीत कित्येक अक्षरांच्या मध्यभागी लागत असते. मोडीतही तसेच आहे, **का, ख, जा, टा, था, ना, फा, बा, भा, मा, या, वा**, यांस आ कार प्रत्यक्ष वर्णात लागला आहे. जी मोडीत गाठ म्हणून दिसते ती अशोक लिपीत रेघ आहे, काळानुसार आणि जलद गतीने लिखाण होण्यासाठी रेघेची गाठ झाली तर त्यात वावग ते काय.

- ई ची खुण अशोक लिपीत दोन किंचित वाकड्या रेघा आहेत. म्हणजे ते दीर्घ नसून ह्रस्व आहे.
- ऊ कारासाठी मोडीत चार पद्धती आहेत. पहिली म्हणजे बाळबोध प्रमाणे खाली, दुसरी म्हणजे डाव्या बाजूला, तिसरी म्हणजे उजव्या बाजूला आणि चौथी म्हणजे अक्षराच्या बाजूला. परंतु या ऊ काराचा अभ्यास अशोक लिपिशिवाय शक्य नाही. नाहीतर काहीतरी मनसोक्त चिन्हे काढली आहेत असे वाटते. अशोक लिपीत ऊ कारा साठी दोन आडव्या आणि उभ्या रेषा असतात. मोडीतील उकरची गाठ ही वर उल्लेख केल्याप्रमाणे जलद गतीने लिखाण होण्यासाठी रेघेची गाठ झाली आहे असे म्हणण्यास हरकत नाही.




**देवनागरी, आशोक आणि मोडी अक्षरे**

# ४.० बालबोध, देवनागरी आणि मोडी लिपी











- बालबोध आणि मोडी यांच्यातील एक व्यवच्छेदक उदाहरण म्हणजे बालबोध मध्ये काने वरुन खाली लिहितात तर मोडीमध्ये खालून वर लिहितात.
- मोडी वर्ण ही अक्षरे आहेत कारण ती कान्याशिवाय काढताच येत नाहीत.
- बालबोध आणि मोडी यांच्यातील साम्य नसलेली अक्षरे पहाता असे दिसते की मोडी ही बालबोध वरून निघाली नाही.
- मोडी ही बालबोध त्वरेने लिहिण्यासाठी सिद्ध केली, अशी समजूत आहे. परंतू मोडीतील **ग, ड, झ, ज, ष** आणि **क्ष** यांच्या रेखाटांनावरून असे वाटत नाही.
- मोडी **क** आणि **फ** बालबोधपासून फार दूर आहेत. विशेषतः उजव्या बाजूच्या कान्यात. ह्रस्व आणि दीर्घ स्वरांच्या लेखनातले भिन्नत्व मोडीत नाही.
- मोडीत **ऋ** लिहिता येत नाही.
- मोडीत **ए, ऐ** यांना स्वतंत्र चिन्हे नाहीत, ते **अ** ला मात्रा देऊन दाखवले जातात.
- प्राकृतव्याकरणांत **दीर्घह्रस्वौ मिथो वृत्तौ** म्हणून सूत्र आहे. म्हणजे दोन शब्दांचा समास झाला असता ह्रस्व दीर्घांचा परस्पर दीर्घ ह्रस्व होतो. म्हणजे संस्कृतात व प्राकृतांत जो भेद तोच बालबोधीत व मोडीत असून तेच साम्य मोडीत व अशोकलिपीत आहे.
- याप्रमाणे प्राकृतभाषेत व मोडीलिपीत वर्णसंख्या आणि वर्णरूप भरपूर साम्य आहे. भाषेच्या आवश्यकतेप्रमाणे म्हणजे उच्चाराची गरज भागण्यास्तव, लिपीच्या रूपात वेळोवेळी फरक होत असतो. यावरून मोडी ही प्राकृतची लिपि असून बालबोध ही संस्कृत लिपि अथवा देवनागरी लिपि असावी, असे जे वाटते ते काही अंशी खरे आहे. म्हणजे मोडीने बालबोधपासून शक्य तेवढी मदत घेतली पण जिथे गरज आहे तिथे आपले स्वातंत्र्य कायम ठेवले.

# <u>५.० मोडी बाराखडी</u>

आता आपण पुस्तकाच्या महत्वाच्या मुद्दयाकडे वळूया तथा ज्याच्यासाठी हा अट्टहास केला ती मोडी बाराखडी खालीलप्रमाणे












## <u>स्वर</u> –

मोडीतील अ ची सुरुवात ही रेषेच्या वरुण होते. त्याचप्रमाणे आ देखील रेषेवरून सुरू होतो. ए आणि ऐ साठी अ चा वापर केला जातो. त्यासाठी स्वतंत्र रेखाटने  नाहीत.










| | | |
|---|---|---|
| **अ**<br> | **आ**<br> | **इ**<br> |
| **ई**<br> | **उ**<br> | **ऊ**<br> |
| **ए**<br> | **ऐ**<br> | **ओ**<br> |
| **औ**<br> | **अं**<br> | **अ:**<br> |

<u>**व्यंजने**</u>






**क** – वर उल्लेख केल्याप्रमाणे मोडीत ह्रस्व – दीर्घ नसतात. त्यामुळे क साठीची पहिली आणि दुसरी वेलांटी ही सारखीच आहे. त्याचप्रमाणे उ कार सुद्धा ह्रस्व आणि दीर्घ नाहीत. व्यंजनांमध्ये फक्त कु या व्यंजांनालाच उकार अक्षराच्या आधीपासून सुरू होतो.

| | | |
|---|---|---|
| क<br> | का<br> | कि<br> |
| कि<br> | कु<br> | कू<br> |
| के<br> | कै<br> | को<br> |
| कौ<br> | कं<br> | कः<br> |




**ख –** मोडी लिपीतील ख हा बालबोध आणि अशोक लिपी पेक्षा पुर्णपणे वेगळा आहे. खाली दिल्याप्रमाणे ख ची बाराखडी आहे.





| | | |
|---|---|---|
| ख  | खा  | खि  |
| खी  | खु  | खू  |
| खे  | खै  | खो  |
| खौ  | खं  | खः  |

**ग** – मोडी लिपीतील ग हा पुर्णपणे बालबोध तथा देवनागरी लिपीसारखा आहे, यत्किंचितही फरक नाही. फक्त उ आणि गु मध्ये साम्य आहे.








| | | |
|---|---|---|
| **ग**<br> | **गा**<br> | **गि**<br> |
| **गी**<br> | **गु**<br> | **गू**<br> |
| **गे**<br> | **गै**<br> | **गो**<br> |
| **गौ**<br> | **गं**<br> | **ग:**<br> |

**घ** – घ देखील बालबोध-देवनागरी लिपीसारखाच आहे.

| | | |
|---|---|---|
| **घ**<br> | **घा**<br> | **घि**<br> |
| **घी**<br> | **घु**<br> | **घू**<br> |

| | | |
|---|---|---|
| घे  | घै  | घो  |
| घौ  | घं  | घः  |

**च –** मोडी लिपीतील च हा साधारणपणे देवनागरीतील उ सारखा आहे.



| | | |
|---|---|---|
| च  | चा  | चि  |
| ची  | चु  | चू  |
| चे  | चै  | चो  |
| चौ  | चं  | चः  |

**छ** – मोडी लिपीतील छ हा जवळपास देवनागरी लिपीतील छ सारखाच आहे. फक्त देवनागरीमध्ये छ ला जी उभी रेष असते, जी मोडीलिपीतील छ मध्ये नसते.








| | | |
|---|---|---|
| छ | छा | छि |
| छी | छु | छू |
| छे | छै | छो |
| छौ | छं | छः |

**ज** – मोडी लिपीतील ज हा जवळपास  देवनागरीतील चार ४ सारखा असतो.










| | | |
|---|---|---|
| ज | जा | जि |
| जी | जु | जू |

| | | |
|---|---|---|
| जे<br> | जै<br> | जो<br> |
| जौ<br> | जं<br> | जः<br> |








**झ** – मोडीतील झ हा देवनागरीतील झ सारखाच असतो. फक्त देवनागरीतील इ ला पोकळ गाठ देऊन इ ला जोडलेला असतो.

| | | |
|---|---|---|
| झ<br> | झा<br> | झि<br> |
| झी<br> | झु<br> | झू<br> |
| झे<br> | झै<br> | झो<br> |
| झौ<br> | झं<br> | झः<br> |


ट – मोडी लिपीतील ट हा मोडीतील र सारखाच असून र ला थोडा बाक दिल्यास ट तयार होतो. मोडी ट चे उकार हे देवनागरीसरखेच असतात.






| | | |
|---|---|---|
| ट  | टा  | टि  |
| टि  | टु  | टू  |
| टे  | टै  | टो  |
| टौ  | टं  | टः  |

**ठ –** मोडीलिपीतील ठ हा ट सारखाच असून ट च्या  मोकळ्या भगात एक टिंब ठेवल्यास ठ तयार होतो.





| | | |
|---|---|---|
| ठ<br> | ठा<br> | ठि<br> |
| ठी<br> | ठु<br> | ठू<br> |
| ठे<br> | ठै<br> | ठो<br> |
| ठौ<br> | ठं<br> | ठः<br> |

**ड –** मोडीतील ड हा बालबोध तथा देवनागरीसरखाच असतो.











| | | |
|---|---|---|
| ड<br> | डा<br> | डि<br> |
| डी<br> | डु<br> | डू<br> |

| | | |
|---|---|---|
| डे<br> | डै<br> | डो<br> |
| डौ<br> | डं<br> | डः<br> |










**ढ** – मोडी लिपीतील ढ हा साधारण देवनागरीतील ढ सारखाच असून अक्षर पूर्ण करण्याची पद्धत थोडी वेगळी आहे.

| | | |
|---|---|---|
| ढ<br> | ढा<br> | ढि<br> |
| ढी<br> | ढु<br> | ढू<br> |
| ढे<br> | ढै<br> | ढो<br> |
| ढौ<br> | ढं<br> | ढः<br> |


**ण** – देवनागरी आणि मोडी लिपीतील ण हा सारखाच असून काही ठिकाणी खाली दिल्याप्रमाणे काढतात. अक्षर वरती जोडण्याआधी एक बारीकशी गाठ देतात.





| | | |
|---|---|---|
| **ण**<br> | **णा**<br> | **णि**<br> |
| **णी**<br> | **णु**<br> | **णू**<br> |
| **णे**<br> | **णै**<br> | **णो**<br> |
| **णौ**<br> | **णं**<br> | **णः**<br> |

**त** – मोडी लिपीतील त हा देवनागरी सारखाच आहे. फक्त त ची दांडी वरच्या रेषेला जोडून उभी रेष तिला जोडूनच घेतात.






| | | |
|---|---|---|
| त  | ता  | ति  |
| ती  | तु  | तू  |
| ते  | तै  | तो  |
| तौ  | तं  | तः  |

**थ** – मोडीतील थ हा जवळपास मोडीतील ख सारखाच असून याची सुरुवात रेषेखालून होते. उकार हे देवनागरी सारखेच असतात.





| | | |
|---|---|---|
| थ  | था  | थि  |
| थी  | थु  | थू  |

| | | |
|---|---|---|
| थे  | थै  | थो  |
| थौ  | थं  | थः  |











**द –** मोडीतील द हा साधारणपणे देवनागरी अंक ६ सारखा असतो.

| | | |
|---|---|---|
| द  | दा  | दि  |
| दी  | दु  | दू  |
| दे  | दै  | दो  |
| दौ  | दं  | दः  |







**ध** – मोडीतील ध हा देवनागरीप्रमाणे असून धा पासून देवनागरी सारखेच असते, कधीकधी धू हा देवनागरी प्रमाणे न काढता मोडीतील ध ला उजव्या बाजूला उकार जोडलेला असतो.


| | | |
|---|---|---|
| ध  | धा  | धि  |
| धी  | धु  | धू  |
| धे  | धै  | धो  |
| धौ  | धं  | धः  |

**न** – मोडी लिपीतील न हा ज सारखा असून ज या अक्षरातील पोकळीला भरीव केले की न तयार होतो.









| | | |
|---|---|---|
| न<br> | ना<br> | नि<br> |
| नी<br> | नु<br> | नू<br> |
| ने<br> | नै<br> | नो<br> |
| नौ<br> | नं<br> | नः<br> |



**प** – मोडीतील प हा साधारण इंग्रजी w सारखा असतो आणि उर्वरीत अक्षरे देवनागरीसरखी असतात.

| | | |
|---|---|---|
| प<br> | पा<br> | पि<br> |
| पी<br> | पु<br> | पू<br> |








| | | |
|---|---|---|
| **पे**<br> | **पै**<br> | **पो**<br> |
| **पौ**<br> | **पं**<br> | **पः**<br> |




**फ** – देवनागरी प सारखा आकार असून त्याला दोन पोकळ गतीने वरच्या रेषेला जोडतात.

| | | |
|---|---|---|
| **फ**<br> | **फा**<br> | **फि**<br> |
| **फी**<br> | **फु**<br> | **फू**<br> |
| **फे**<br> | **फै**<br> | **फो**<br> |










| फौ | फं | फ: |
|---|---|---|
|  |  |  |

**ब –** मोडीतील ब हा साधारणत: देवनागरी अंक ६ सारखा असून भरीव गाठीने वरच्या रेषेला जोडतात.

| ब | बा | बि |
|---|---|---|
|  |  |  |
| **बी** | **बु** | **बू** |
|  |  |  |
| **बे** | **बै** | **बो** |
|  |  |  |








| बौ | बं | बः |
|---|---|---|
|  |  |  |




**भ** – मोडीतील भ हा देवनागरी सारखाच असून काही ठिकाणी भ वेगळ्या पद्धतीने काढतात ते पुढील भागात दिले आहे.

| भ | भा | भि |
|---|---|---|
|  |  |  |
| **भी** | **भु** | **भू** |
|  |  |  |
| **भे** | **भै** | **भो** |
|  |  |  |






| भौ | भं | भः |
| --- | --- | --- |
|  |  |  |



**म –** मोडीतील म हा जवळपास मोडीतील क सारखाच असतो. मु काढताना अर्धा म काढून त्याला उकार जोडला जातो.

| म | मा | मि |
| --- | --- | --- |
|  |  |  |
| **मी** | **मु** | **मू** |
|  |  |  |
| **मे** | **मै** | **मो** |
|  |  |  |








| | | |
|---|---|---|
| **मौ**  | **मं**  | **मः**  |



**य –** मोडीतील य हा साधारणपणे देवनागरीतील अंक ७ ला प्रतिबिंबीत केल्यास जसा आकार येईल तसा असतो. या आणि का मध्ये कधीकधी गोंधळ होण्याचा संभव असतो.

| | | |
|---|---|---|
| **य**  | **या**  | **यि**  |
| **यी**  | **यु**  | **यू**  |
| **ये**  | **यै**  | **यो**  |






| यौ | यं | यः |
|---|---|---|
|  |  |  |




**र** – मोडीतील र हा साधारणपणे एक उभी रेष असून त्याला शेवटी थोडा वर्तुळाकार दिलेला असतो. मोडीत र ची करामत असते. पुढील भगत त्याबद्दल सविस्तर चर्चा केलेली आहेच.

| र | रा | रि |
|---|---|---|
|  |  |  |
| **री** | **रु** | **रू** |
|  |  |  |
| **रे** | **रै** | **रो** |
|  |  |  |











| | | |
|---|---|---|
| **रौ**<br> | **रं**<br> | **रः**<br> |

**ल –** मोडीतील ल हा देवनागरी अंक ४ सारखा असतो. ला आणि का मध्ये बरेच साधर्म्य आहे.








| | | |
|---|---|---|
| **ल**<br> | **ला**<br> | **लि**<br> |
| **ली**<br> | **लु**<br> | **लू**<br> |
| **ले**<br> | **लै**<br> | **लो**<br> |
| **लौ** | **लं** | **लः** |

| | | |
|---|---|---|
|  |  |  |












**व** – मोडीतील व हा खालीलप्रमाणे असून याचे साधर्म्य अशोक लिपि वा देवनागरीशी नाही.

| | | |
|---|---|---|
| **व**  | **वा**  | **वि**  |
| **वी**  | **वु**  | **वू**  |
| **वे**  | **वै**  | **वो**  |
| **वौ**  | **वं**  | **वः**  |







**श –** मोडीतील श हा देवनागरी प्रमाणेच असून याची सुरुवात एका लहान उभ्या रेषेने सुरू होते.

| | | |
|---|---|---|
| **श**<br> | **शा**<br> | **शि**<br> |
| **शी**<br> | **शु**<br> | **शू**<br> |
| **शे**<br> | **शै**<br> | **शो**<br> |
| **शौ**<br> | **शं**<br> | **शः**<br> |











**ष –** मोडीतील ष हा देवनागरिप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| **ष**<br> | **षा**<br> | **षि**<br> |
| **षी**<br> | **षु**<br> | **षू**<br> |
| **षे**<br> | **षै**<br> | **षो**<br> |
| **षौ**<br> | **षं**<br> | **षः**<br> |









**स** – मोडीतील स हा देवनागरी अंक ७ प्रमाणे असतो.

| | | |
|---|---|---|
| **स**  | **सा**  | **सि**  |
| **सी**  | **सु**  | **सू**  |
| **से**  | **सै**  | **सो**  |
| **सौ**  | **सं**  | **सः**  |











**ह –** मोडीतील ह हा मोडीतील द , ब शी मिळताजुळता आहे. त्यामुळे इथे गोंधळ होण्याची शक्यता असते.

| | | |
|---|---|---|
| **ह**  | **हा**  | **हि**  |
| **ही**  | **हु**  | **हू**  |
| **हे**  | **है**  | **हो**  |
| **हौ**  | **हं**  | **हः**  |







**ळ –** मोडीतील ळ हा देवनागरी प्रमाणेच असतो.

| | | |
|---|---|---|
| **ळ**  | **ळा**  | **ळि**  |
| **ळी**  | **ळु**  | **ळू**  |
| **ळे**  | **ळै**  | **ळो**  |
| **ळौ**  | **ळं**  | **ळः**  |

**क्ष** – मोडीतील क्ष हा देवनागरी प्रमाणेच असून याला वरील रेषेला  जोडण्यासाठी भरीव गाठ वापरतात.

| | | |
|---|---|---|
| **क्ष** | **क्षा** | **क्षि** |
|  |  |  |
| **क्षी** | **क्षु** | **क्षू** |
|  |  |  |
| **क्षे** | **क्षै** | **क्षो** |
|  |  |  |
| **क्षौ** | **क्षं** | **क्षः** |
|  |  |  |

**ज्ञ** – मोडीतील ज्ञ हा पूर्ण एक अक्षर नसून देवनागरी सहा आणि न यांचा मिलाप  आहे.

| | | |
|---|---|---|
| **ज्ञ**<br> | **ज्ञा**<br> | **ज्ञि**<br> |
| **ज्ञी**<br> | **ज्ञु**<br> | **ज्ञू**<br> |
| **ज्ञे**<br> | **ज्ञै**<br> | **ज्ञो**<br> |
| **ज्ञौ**<br> | **ज्ञं**<br> | **ज्ञ :**<br> |


# ६.० पाच दिवसात मोडी

पाच दिवसांत  मोडी शिकण्यासाठी चला शिकूया मोडी आपण आणि मोडी प्राशिक्षण पुस्तिका या ग्रंथांत एक सोपी पद्धत वापरली आहे, आपण त्या प्रमाणे जाऊया.

## दिवस पहिला

मोडीतील काही अक्षरे ही बालबोध लिपीतील अक्षरांप्रमाणेच आहेत. पहिल्या दिवशी अशी सोपी अक्षरे शिकून – समजून घेतल्याने मोडीविषयीची नहक भीती कमी होईल.

ग    घ    भ    ष    त





ण    श    ड    छ    ळ




वरील अक्षरांत ग, घ, भ, ष, छ, ळ या अक्षरांत फरक दिसत नाहीत. छ किंवा ळ काढताना बालबोधप्रमाणे न थांबता एकदमच काढा.

**आकार** – वरील अक्षरांचे आकार हे बालबोध प्रमाणेच असतात. ते खालीलप्रमणे,


तत्पूर्वी मोडीत **भा** हा  अशाप्रकारे देखील काढतात.







**इ कार** – मोडी लिपीत **ई** काढताना मुळ मोडी अक्षराला साधारणतः देवनागरी **४** सारखी गाठ देतात.



**उ कार -** वरील अक्षरांचे उकार हे बालबोध प्रमाणेच आहेत. **गु** आणि **तु** हे मात्र वेगळे असतात.




याप्रमाणे उरलेली बाराखडी ही अगोदर दिल्याप्रमाणे अभ्यासावी, उरलेली बाराखडी ही जवळपास देवनागरी सारखीच आहे.







| | | | |
|---|---|---|---|
| तलवार |  | सिंहासन |  |
| शिवाजी |  | सरकारी |  |
| सुखदेव |  | भीमसेन |  |
| कमल |  | पत्र |  |
| बातमी |  | मुंबईकर |  |

# दिवस दुसरा


पहिल्या दिवशी आपण बालबोधसारख्या असलेल्या दहा अक्षरांचा अभ्यास केला. आज आणखी थोडे साम्य असलेली अक्षरे पाहू.

ह इ द ध ख र ट ठ ज न



वरील अक्षरांत  ला वेलांटी दिली की ई तयार होतो. याच  ला आतील बाजूस गाठ दिली की ध तयार होतो. त्याचप्रमाणे  ला वरील बाजूस गाठ दिल्यास  तयार होतो. मोडीतील  हे अक्षर छत्रीच्या मुठीसारखे असते. हेच  चे टोक उजवीकडे थोडे वळवले की  तयार होतो. याच  च्या पोकळीत एक टिंब दिला की  तयार होतो. देवनागरीतील ४ या अंकाला डाव्या बाजूला गाठ दिली की  तयार होतो आणि गाठ भरीव केली की .  तयार होतो.

**आकार** – खलील अक्षरांत **दा** आणि **धा** यांचे काने सुटे आहेत.




**ईकार** – वरील अक्षराचे इकार हे पहिल्या दिवशी सांगितलेल्या इकारा प्रमाणेच आहेत.





उकार आणि पुढील बाराखाडी ही अगोदरप्रमाणेच असून बाराखडीतील तक्त्यातून अभ्यासावी.

# <u>दिवस तिसरा</u>

पहिल्या दोन दिवसांत वीस अक्षरांचा अभ्यास झाला. आज आपण पुढील दहा अक्षरे पहाणार आहोत. थोड्याफार फरकाने ही अक्षरे कशी बदलतात हे आपल्याला दिसून येईल.

स य म फ झ प थ क ल च



वरील अक्षरांत  हे अक्षर देवनागरीतील ७ सारखे आहे. याच्या अगदी उलट केले की  तयार होतो. म हे अक्षर बालबोध सारखेच असते. देवनागरी प काढून त्याला वक्र गाठ दिली की  तयार होतो.  हा देवनागरीप्रमाणेच असतो. **ख** ची वरील गाठ रेषेच्या खाली घेतली की **थ** तयार होतो. **क** हा जवळपास **म** सारखा असतो. देवनागरी **चार** म्हणजे **ल** आणि साधारण उ म्हणजे **च** होय.

**आकार** – **पा** आणि **था** ला स्वतंत्र काने आहेत. बाकी उरलेली अक्षरे गतीने जोडलेली आहेत.




**इकार** – **लु** सोडल्यास उरलेले सर्व उकार हे सारखेच आहेत.



पुढील बाराखडी साठी बाराखडी तक्त्याची मदत घ्यावी.

# दिवस चौथा








आतापर्यंत आपण तीस अक्षरे अभ्यासली. आता पुढील दहा अक्षरे बघूयात.

| व | ब | आ | ओ | औ | अ | ए | ऐ | अं | अः |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|






 या अक्षराला डाव्या बाजूस मध्यावर गाठ दिली की  तयार होतो. तसेच  या अक्षराच्या वरच्या बाजूस डावीकडे गाठ दिली की  तयार होतो. त्यावर अनुक्रमे एक आणि दोन मात्रा दिल्यास अनुक्रमे  आणि  तयार होतात. त्याचप्रमाणे **अ** ला एक मात्र दिल्यास **ए** आणि दोन मात्रा दिल्यास **ऐ** तयार होतात.




आणि उरलेली बाराखडी आधी शिकवल्यासारखी असेल. यात काही वेगळेपण नाही.









| | | | |
|---|---|---|---|
| जल |  | राजाराम |  |
| औषध |  | आधी |  |
| वनौषधी |  | प्रकाश |  |
| हनुमान |  | रामायण |  |
| शिमगा |  | महाभारत |  |

# दिवस पाचवा

आतापर्यंत आपण चाळीस अक्षरे पाहिली. आता उरलेली आणि शेवटची अक्षरे आजच्या शेवटच्या दिवशी पाहुयात.




















| उ | क्ष | ज्ञ | ढ |
|---|---|---|---|
|  |  |  |  |

 हा साधारणपणे मोडी ज सारखा असून डाव्या बाजूची गाठ रेषेवरून आली असून थोडी खाली आणि थोड्या अंतरावर आहे.  हा देवनागरीप्रमाणेच असतो.  हे मोडीतील शेवटचे अक्षर अशोक आणि देवनागरीहून वेगळे आहे. साधारणतः देवनागरीतील ६ आणि मोडीतील न यांच्या संयोगाने हे अक्षर तयार होते. उरलेली बाराखडी ही सारखीच आहे. मोडी ड पूर्ण न काढता अर्धा काढून गाठ दिल्यास  तयार होतो.

| | | | |
|---|---|---|---|
| मेघनाद |  | महात्मा |  |
| रायगड |  | चिरंजीव |  |
| आज्ञापत्र |  | कोतवाल |  |
| फर्मान |  | नंदिघोष |  |
| ज्योत |  | श्रीमान |  |

# ७.० जोडाक्षरे


आता आपण मोडी लिपीतील काही जोडाक्षरे पाहूयात.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कल्पना |  | इंग्रजी |  | स्तोत्र |  |
| ह्यांचा |  | आपत्ती |  | स्वदेशी |  |
| जेव्हा |  | स्मरण |  | सशौर्य |  |
| कोल्हा |  | थोड्या |  | पाण्यात |  |
| श्रीकृष्ण |  | कल्याण |  | आमच्या |  |
| शब्द |  | दुप्पट |  | तेजस्वी |  |
| नमस्कार |  | म्हणजे |  | विद्वान |  |
| त्याला |  | कर्ज |  | व्यवस्था |  |
| मोठ्या |  | फक्त |  | महात्मा |  |
| विश्वेश्वर |  | मास्तर |  | व्यवसाय |  |

# ८.० पत्रांचे मायने


ऐतिहासिक कागदपत्रांत पत्रालेखन हा एक महत्वाचा भाग आहे. पत्र लेखनात मायन्यांना फार महत्व आहे. त्यावरून पत्र पाठविणारा आणि पत्र स्वीकारणारा यांचे संबंध समजतात. आपल्या सेवकास, विद्वान व्यक्तीस, आश्रितास, छत्रपतीस, पेशव्यांस. राजघराण्यातील स्त्रीयांस याचे काही नियम व संकेत होते. खाली काही मायने उदाहरणादाखल दिले आहेत, खाली दिलेले मोडी लीप्यांतर खचितच उपयोगी पडेल.

१.० स्वस्ती श्री राज्याभिषेक शके ४७ शर्वरीवारीनाम संवत्सरे बहुल दसमी (दशमी) भृगुवासरे क्षेत्रीयेकुलावतंस श्रीराजा शेंभू छेत्रपती स्वामी याणी वेदशस्त्रसंपन्न देवदत्त कवींद्र बिन परमानंद कवींद्र गोत्र काश्यप शाखा तैतरीय सूत्र आपस्तंभ यांसी




---

२.० अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री नारो आप्पाजी गोसावी यांसी सेवक रघुनाथ बाजीराव नमस्कार




३.० स्वामी श्रीराज्याभिषेक शके ५७ साधारण संवत्सरे श्रवण बहुल सप्तमी मंदवासरे क्षत्रिये कुलवतंस शश्री राजा शाहू छत्रपती समी याणी मोकादमाणी मौजे नालेश्वर वानवले आज्ञा केली.




---

४.० राजश्री त्रिंबकजी डेंगळे गोसावी यांसी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री बाजीराव रघुनाथ प्रधान आशीर्वाद सु सीत आशार मयातैन व अलफै




---


५.० अभयेपत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वसनिधी राजमान्ये राजेश्री बाजीराव पंडित प्रधान ता मोकादमान मौजे रावेत ता हवेली प्रां पुणे सुहूर सान खमस अशरीन मया व अलफै दिल्हे अभयपत्र एसेजे




६.० स्वस्ती राज्याभिषेक शके ४३ दुर्मुखनाम संवत्सरे अस्विन बहुल एकादशी भानूवासरे क्षेत्रीये कुलवतंस राजश्री शाहू छत्रपती स्वामी याणी रूण प्रा मालकपूर यांस दिले.



७.० आज्ञापत्र समस्त राजकार्ये धुरंधर विश्वसनिधी  राजमान्ये राजेश्री नारो  पंडित सचिव ता पानसरे व पथ्की जाकती महाल भोर यांजप्रती.




८.० अखंडित लक्ष्मी विराजित बा व येशवंत राजमुद्रा विराजित राजमान्ये सेवक आज्ञाधारक मल्हारजी होळकर दंडवत विनंती उपरी




---

९.० श्रीयासह चिरंजीव विजयीभव राजमान्ये राजेश्री बाजीराऊ यांसी प्रती मातुश्री राधाबाई आशीर्वाद उपरी




---

१०.० श्रीमंत सकालगुणालांकरण विद्वज्जन मंडण धर्ममूर्ती पारायण गोदवीत प्रतीपालन अखंडित लक्ष्मी प्रसन्न महाराजाधिराज राजेश्री रावसाहेबांचे सेवेशी



११.० श्रीमंत उत्तमगुण परिपूर्ण अखंडित लक्ष्मी प्रसन्न राजमान्य राजश्रीया विराजित पंडित स्वामी गोसावी यांचे सेवेसी



# १.० सरावासाठी काही ऐतिहासिक पत्रे

## पृथ्वी स्वामिस वश आहे

श्री

बाजीराव व चिमाजी आप्पा यांचा सगळ्या उत्तर हिंदुस्थानावर दहशत बसवणारा पहिला मोठा पराक्रम खलील पत्रांत आहे. ते दोघे एकदम पुण्याहून निघाले. चिमाजी आप्पा पश्चिमेच्या बाजूने खानदेशातून व बाजीराव पूर्वेच्या बाजूने व्हाडातून. मळव्यांत आमझेरा येथे गिरिधर बहाद्दर व दया बहाद्दर हे दोघे नामांकित मोगल अंमलदार फौज घेऊन सज्ज असता त्यांवर चिमाजी आप्पाने नर्मदा उतरून २८ नोव्हेंबर १७२८ रोजी पाठीमागून हल्ला करून मोगलांचा फन्ना उडवला. दोघेही सरदार निधन पावले, ते वर्तमान या पत्रात आहे.

श्रीमंत राजश्री चिमणाजी–
पंत आपा स्वामीचे सेवेसी,

सेवक कृष्णराव महादेव कृतानेक साष्टाग नमस्कार विज्ञापना येथील कुशल ताा पौष शुद्ध पचमी मुाा कल्याण स्वामीचे कृपेकरून आमचे व या प्रातीचे वर्तमान यथास्थित असे यानंतर स्वामीनी संतोपाची आज्ञापत्रे पाठविलीं ती प्रविष्ट जाली तेथे लिहिले की दयाबाहादुर याणे चालोन येऊन बारी धरिली. मग आपण सख्ती करून युधप्रसग बरा दाट जाला दयाबहादुर व त्याचे सरदार ठार जाले. लुट्टून फना केला म्हणून लिहिले, त्यावरून बहुत संतोश जाला स्वामी पुन्यपुरुष, येशस्वी, श्रीची दया व वडिलाचे पुन्य समर्थ, यामुलेच यैसी येशे स्वामीचे पदरी पडतात दयाबहादुर त्या प्राते मोहोरा सामान्य नव्हता त्यासच मोडिला याउपरी पृथ्वी स्वामीस वस्य आहे. याउपरी श्री कधीही न्यून पडो देणार नाही टक्या पैकियासही काये उणे! याउपरी वरचेवर आपणाकडील संतोशवृत्त लेहून समाधान पावीत गेले पाहिजे हे विनंती

[illegible]

[illegible]


[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

# हा आयत्नी मार्ग ऐसाच आहे

शिवछत्रपतींची सून , छत्रपती संभाजी महाराजांची पत्नी, शहुंची मातु:श्री येसूबाई सुमारे तीस वर्षे बादशहाच्या कैदेत राहिल्या. त्यांचा मृत्यूसंबंधाचे संतवनपर पत्र कोल्हापूरकर संभजीने शाहू महाराजांना लिहिले आहे.

**श्रीमत् सकलतीर्थस्वरूप राजश्रिया विराजमान राजश्री शाहूराजे दाजी वडिलाचे सेवेसी,**

**अपत्य संभाजीराजे दंडवत विनंति उपरी वडिली आशीर्वाद-पत्र पाठविलें ते प्रविष्ट जालें मातु श्री येसूबाई साहेब यासी वेथा होऊन कैलासवास जाला म्हणोन लिहिले, त्यावरून ममताविषयें चित्तास परम खेद प्राप्त जाला. हा अयत्नी मार्ग ऐसाच आहे वडील सर्वज्ञ आहेत. विवेकेंकरून चित्ताचें सातवन होय तें केलें पाहिजे विशेष लिहावें तरी वडिल सुज्ञ आहेत.**



# कालचक्रानुसार विपरितार्थ

सदाशिवराव भाऊंचा प्रेतसंस्कार यथासांग केल्याबद्दलचा मजकूर मराठ्यांचा सुजाउद्दौला याजवळचा वकील काशीराज शिवदेव याने पेशव्यास खलील पत्रांत लिहून कळविला आहे, यावरून पुढे सदाशिवराव भाऊंचा तोतया खोटा होता अशी पेशव्यांची पूर्ण खात्री पटली.

श्रीसाब शिव प्रा

**श्रीमंत रा पंत प्रधान स्वामीचे सेवेसी —**

पो। काशीराज शिवदेव दि।। नवाब शुजाउद्दौला कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना यैसीजे येथील कुशल जाणून स्वामीही निजानदवैभवलेखनाम आज्ञा करीत असले पाहिजे विशेष. येथील प्रसंग आपले सैन्याचा व गिलज्याचा मुकाबिला होता कालचक्रानुसार विपरीतार्थ निदर्शनास आला तो परस्परे सेवेसी विनंती जाला असेल. येजमानाचा आपला स्नेह अविछिन आक्रित्रीम आहे तोच आहे अगतिकत्वे येणें जाले यथाशक्य सोरस्यास मनोदये होता परंतु भगवत सत्ता यैसीच होती, त्यास उपाये काये? जुंज मोडलिया महायिवनेछा विपरीत भावे होती त्यास आम्ही ब्राह्मण व आपले सेवक अमता अर्थ व्हावा हें अनुचित जाणून येजमानास बोध करून महतायासे श्रीमंत भाऊ सो व श्रीमत रावसो-बाची शवे रणागणीहून आणून ब्राह्मण मडळीचे महित चदनादि उपचारे संस्कार केला हेहि त्याचेच पुण्य महायें जालें की यैसा योग जाला असता

संस्कार येथाविधि जाला जे शर्तमर्दीची ते केली का जसे आपले आश होते येजमानास या प्रसंगामुळे बहुत खेदावह जाले

स्वामीराजांसहि परम दुःखावह होईल परंतु भगवत इच्छेस उपाये काये? स्वामी सर्वज्ञ आहेत विज्ञापना करावी यैसा अर्थ नाहीं सेवकास दासवर्गात जाणून सदैव आज्ञापत्री सनाथ करीत जावें बहुत काये लिहिणे, कृपा निरतर असो दीजे हे विज्ञापना माघ कृष्ण १२ मु।। दिल्ली

श्रीकंठ स्मरण श्री॥

श्रीमंत रा॥ पंत प्रधान स्वामींचे सेवेसी, -


[illegible]

# नाना फडणीसचा मृत्यू

## पुण्याहून पटवर्धनांचे मिरजेस पत्र

विज्ञापना ऐशी जे—

श्री।। नाना याचा काळ व।। ३ गुरुवारी मध्यरात्रीस जाला. समस्त मुत्सद्दी आले होते प्राणोत्क्रमण समयीं श्री।। राजश्री (अमृत) रावसाहेब हेही आले परंतु भाषण नाही तसेच वाड्यात गेले. शव माजघरांतून जाळीपुढे आणिले. गंगेवर न्यावयाची सिद्धता जाली, तो आरबानी आपले फडशाकरिता अडथळा घातला. नतर राजश्री दुल्लभदास यानी हवाला घेतला, तेव्हा शव बाहेर जाऊं दिले. या खटपटीस सूर्योदय जाला नदीवर दहा सहस्र माणूस मिळाले होते. नानाकरिता शहरात ते दिवशी हाहाकार जाला तो काय वर्णावा ? मातोश्री बाया सिद्धटेकास होत्या, त्यास भृगुवासरीं प्रहर रात्रीस वर्तमान समजले. नंतर निघाल्या सायंकाळचे श्री।। राजश्री रावसाहेब व बाबा फडके, चक्रदेव वगैरे झाडून समाचारास्तव आले होते स्वामीस कळावे सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.



## वडिलांप्रमाणे लौकिक करा

दिनांक २० मे १७६६ रोजी मल्हारराव होळकर गोहदनजिक आलमपुर येथे मरण पावला. दौलतीचा वारस त्याचा नातू मलेराव होळकर यास खालील सांत्वनपत्र अहिल्याबाईने लिहिले

श्री

पो छ ९ मोहरम  मुा चरोली प्रात गोहद

चिरंजीव राजश्री मालवा यासि प्रती अहिल्याबाई होल्कर अगीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे तुमचे पत्र येऊन वर्तमान कळो येत नाही तेणे करून चित उद्विग्न आहे तर यैसे न करावें सदैव पत्र पाठऊन सविस्तरे लिहित जाणे आम्ही तुम्हास दोन तीन पत्रे पाठविली आहेत त्या प्रा चिताचे समाधान करावे अता शोक करावयाचा प्रकार नाही सरदारीचा विचार दौलत चालली पाहिजे, यास्तव विवेक करून कामकाजात चित घालून आव घालावा ज्या प्रो तीर्थस्वरूप कैलासवासी सरदारी चालवीत आले त्याच प्रो तुम्ही पाया घालून त्याज प्रों कामकाज चालऊन वडिलाप्रों लौकिक होय तेच तुम्ही कराल अता कोता अंदेशा दूर करून उमदी नजर धरून वडिलाची कीर्ति आहे त्याजपेक्षा तुम्ही अधिक सपादन कराल यातच तुमचा लौकिक आहे राजश्री गंगाधरपंत तात्याच्या * मर्जीनरूप वर्तत जाणे

रा छ २५ माहे जिल्हेज बहुत काये लिहिणे हा आसीर्वाद.

श्री

[illegible]

[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

[illegible]
[illegible]

## **१०.० संदर्भग्रंथ**


१.० मोडी शब्दकोश – W. CAREY (1810)

२.० आर्यलिपी – गो. का. चांदोरकर (१९०८)

३.० चला शिकूया मोडी आपण – मोडी लिपी शिक्षण प्रसारक मंडळ

४.० सुबोध मोडी वाचन -

५.० मोडी लिपी परिचय आणि ऐतिहासिक नमूना पत्रे

६.० भारतीय लिपींचे मौलिक एकरूप – पंडित गणपतीशास्त्री हेब्बार (१९८८)

७.० मराठी व्याकरण - W. CAREY (1810)

८.० मोडी पत्रव्यवहार - तु.पुं.शेट्ये

९.० मोडी लिपी प्रशिक्षण पुस्तिका – डॉ. भास्कर धाटवकार – पुराभिलेख संचालनालय

१०.० मोडी लिपि वाचन सराव - डॉ. भास्कर धाटवकार – पुराभिलेख संचालनालय

११.० मोडी लिप्यांतर कौशल्य – कृष्णाजी म्हात्रे – शील प्रकाशन

१२.० वाचनमाला – राव साहेब दांडेकर – ज्ञानचक्षु प्रेस, पुणे (१८६७)

१३.० वाचनमाला २.० - राव साहेब दांडेकर – ज्ञानचक्षु प्रेस, पुणे (१८६८)

१४.० मराठी रियासत मध्यविभाग १ -

१५.० देवनागरी मुद्राक्षर लेखनकला – खंड १ – बापूराव नाईक (१९८२)

१६.० पाणिनीय व्याकरण आणि भाषा तत्वज्ञान – पंडित व्याकरणतज्ञ वामनशास्त्री बा, भागवत

१७.० मराठशाहीतील निवडक पत्रे – गोविंद सखाराम सरदेसाई

**ई साहित्य प्रतिष्ठानचं बारावं वर्षं. शुभम पाटील यांचं ई साहित्यवरचं दुसरं पुस्तक.**

शुभम पाटील यांचं वाराणसीबद्दलचं पुस्तक खुप गाजलं. त्यांची लिहीन्याची शैली थेट आणि मनमोकळी आहे. उगाच काहीतरी मोठं आव आणून ते लिहीत नाहीत. त्यामुळे ते भिडतं आणि आवडतं. ्ते आज ना उद्या एक मोठे लेखक म्हणून नावाजले जातील. पण सुरुवातीचं काय? लेखक प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांची पुस्तकं विकली जात नाहीत. त्यामुळे त्यांना प्रकाशक त्यांची पुस्तकं छापत नाहीत. कधीकधी तर न वाचताच परत करतात. आणि प्रकाशन झालेच नाही तर हे नवीन लेखक प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात अनेक प्रतिभा गर्भातच मारल्या जातात. अगदी "मृत्युंजय"कार शिवाजी सावंतांचं पुस्तक तीन वर्षं कोणी प्रकाशक वाचूनही पहात नव्हता.

नवीन लेखकांना बळ देण्यासाठी आपण सर्व वाचक आणि ई साहित्यची संपूर्ण टीम आता कटीबद्ध आहे. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या. पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य.

लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत. नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे.

त्याचबरोबर परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. वाचकांनी त्यांना मनात स्थान द्यावे. त्यांच्या सादेला प्रतिसाद द्यावी.

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात.

प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, शुभम पाटील, संजय काळे असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे, आत्मविश्वासाने भारलेले तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?